# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५३–२०१०/ दिनांक :

श्री. शिवगोंडा भुपाळी चवगोंड,
मु. पो. जाडर बोबलाद, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवगोंडा भुपाळी चवगोंड, मु. पो. जाडर बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी अर्ज देवून चलनाची रक्कम रु.५०००/– पावती क्रमांक ५३३८०४६ दि. २२.१.२०१० रोजी भरलेले आहेत.तक्रारदार यांनी क्ष फॉर्ममध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.७९५ दि. ९.२.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ४०४१ दि. २९.३.२०१० रोजी पारीत केले.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी दि. १५.४.२०१० रोजी चाचणी अहवाल क्र. २७२८९ वि.प.कडे दिला. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. १४.७.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते तो मिळाला नाही, म्हणून प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दि. १६७.२०१० रोजी दाखल केली. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल करुन विलंबाबाबत भरपाईची मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. २२.१.२०१० अनामत रक्कम भरल्याचे व चाचणी अहवाल दि. १५.४.२०१० ला प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे. त्यांचे ०.२४ कि.मी. चे लघुदाब वाहिनीचे काम आहे. त्यांना दि. ३.८.२०१० ला नवीन वीज कनेक्शन देण्यात आले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. श्री. खापरे यांनी मंचासमोर सांगितले की, दि. १५.४.२०१० ला टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते, ती प्रत्यक्षात दि. ३.८.२०१० रोजी दिली आहे. ३ आठवड्यांचा विलंब झाला आहे. त्यामुळे ३ आठवड्यांचा विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. ३००/– भरपाई देण्यात यावी. या उलट, वि.प.तर्फे असे सांगण्यात आले की, दि. ३.८.२०१० ला कनेक्शन देण्यात आले आहे. तक्रारदार ग्राहकाने दि. ३.८.२०१० च्या अर्जामध्ये भरपाई नको असे लिहून दिले आहे. सदरचा अर्ज श्री. मैंलापुरे यांनी मंचासमोर दि. १७.८.२०१० ला हजर केला. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तोंडी हरकत नाही असे सांगितले व ग्राहकाच्या अर्जावर माघारी घेणेस हरकत नाही असे लिहून दिले आहे. त्यामुळे तक्रारदार यांना रु. ३००/– भरपाई मिळणेचा हक्क होता तो त्यांनी मूळ तक्रारीत मागे घेतल्याने तक्रार निकाली काढणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष